# राशिभविष्य - जानेवारी, २०१७.


## दादा दामले (dadadamle@gmail.com)


### हे नवे वर्ष आपणा सर्वांना सुखाचे व आरोग्यसंपन्नतेचे जावो, ही सदिच्छा !

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ शारीरिक-मानसिक आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जाण्यातच व्यतीत होईल, असे वाटते. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात वरिष्ठ अधिकारी मंडळीचा त्रास, विरोध किंवा मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता दिसते. जपा. मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण कराल तर होणारा मनस्ताप सुसह्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. विशेष करून कोणताही चिकित्सक बौद्धिक, शैक्षणिक नोकरी-व्यवसाय असणाराना महिन्याचा उत्तरार्ध इतरांपेक्षा अधिक प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. पण व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे व मंगळ ग्रहांमुळे काही मंडळीना जुन्या दबलेल्या प्रकरणांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. तसेच अकारण गैरसमजामुळे मैत्रीत बाधा येणे, शत्रुत्व निर्माण होणे अशा घटना घडण्याची शक्यताही दिसते. जपा. अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. अनारोग्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा येणे संभवते. तसेच मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष, कोणाची आचरणविषयक समस्या अशापैकी कारणांनी या राशीच्या मंडळीना अपेक्षित संततिसुख मिळणे संभवत नाही. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल.

**(२) वृषभ -** या संपूर्ण महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीना स्वत:च्या व कुटुंबियांच्या अनारोग्याच्या समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. नोकरदार मंडळीना कामाचा ताण सहन करावा लागेल; तर काहीना मानहानीचे दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. पण मानसिक आजार तज्ज्ञ आणि द्रव पदार्थांचे व्यापारी, वैद्यकीय व्यावसायिक, औषधविक्रेते यांना मात्र संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या युवकांना हातची नोकरी सोडून नवीन काही करावयाची उर्मी येईल. पण त्यांनी तसे करू नये. सर्व नोकरदार मंडळीना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागण्याची शक्यता आहे. तसेच काहीना वरिष्ठांच्या रोषास पात्र व्हावे लागेल. जपा. व्यापार- उद्योगात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. महिन्याचा उत्तरार्ध मात्र खूपच प्रमाणात अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. अखेरच्या सप्ताहात मानसिक सुखसमाधान लाभेल. पण काहीही कारणाने मैत्रीत वितुष्ट निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात विविध कारणानी बाधा येणे संभवते. जपा. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. संततीशी समजूतदारपणे व सहनशीलतेने आचरण कराल तरच संततीसुख लाभू शकेल. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. मना:शांतीसाठी बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात घरीदारी सर्व ठिकाणी अनुकुल-प्रतिकुल असे संमिश्र स्वरूपाचे अनुभव येतील. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण नातेवाईक मंडळीकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. तसेच बंधुसुखात बाधा येणे संभवते. चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच विशेष करून महिन्याच्या उत्तरार्धात लोखंड व कोळसा यांचा व्यापार असणारांना व वैद्यकीय व्यवसाय आणि औषध विक्रेते यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. मात्र आरोग्यविषयक समस्या त्रस्त करतील.

काहीना पोटविकाराचा तर काहीना मूत्राशय विकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याच्या शेवटच्या सप्ताहात काही मंडळीना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग येतील; पण प्रवासात त्रास होणे संभवते. जपा. अध्यात्माची मनापासून ओढ असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. काही मंडळीना सूचक अशी स्वप्ने पडतील. काहीना गुरुकृपा तर काहीना कीर्ती-प्रसिद्धी मिळणे शक्य दिसते. " वरून कीर्तन, आतून तमाशा " असे ढोंगी आचरण करू नका. विविध कारणानी अपेक्षित संततिसुखात बाधा येणे संभवते. मनाची एकाग्रता करू शकले तरच या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " पठण करा.

(४) कर्क - मंगळ ग्रहाच्या वृश्चिक राशीत शनि ग्रह असल्यामुळे सध्या या राशीच्या काही मंडळींची बुद्धी काही प्रमाणात अति स्वार्थी, मतलबी तर काहींची राजकारणी अशा प्रकारची झाली असावी, असे वाटते. धूर्तपणाचे स्वार्थी आचरण होत असणेही संभवते. पण अशा प्रकारच्या आचरणाचा त्रास तुम्हांलाच सहन करावा लागेल, याची जाणीव असू द्या. शिवाय धनस्थानातील राहू वाद, भांडणतंटे यामुळे कौटुंबिक सुखातही बाधा आणत असण्याची शक्यता दिसते. तसेच काही मंडळीना आर्थिक समस्याही त्रस्त करत असतील. काही मंडळीना बंधुवर्गाकडून मनस्ताप होत असावा, असेही जाणवते. अशा प्रकारची परिस्थिती व मनस्थिती असेल तर काळ प्रतिकुल आहे हे ध्यानात घेऊन मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक असल्यामुळे त्यांनी जे काय साधावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना काळ प्रगतिकारक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक - मानसिक अनारोग्याशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. काही मंडळीना पोटविकाराचा, काहीना रक्तविकाराचा तर काहीना मूत्राशय विकाराचा आजार त्रस्त करील. जपा. पण महिन्याच्या पूर्वार्धात विविध कारणांनी वैवाहिक जीवनातही बाधा येणे संभवते. काहीना परदेशगमनाची संधी मिळेल. मात्र प्रवासात त्रास होणे संभवते. जपा. आपली राशी गुरु ग्रहाची उच्च राशी असल्याने श्री गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

(५) सिंह - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या संपूर्ण काळात शारीरिक , मानसिक अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. काही मंडळीना अकारण अपमान झाल्यासारखे वाटून असह्य संताप सहन करावा लागल्याने त्यांच्या मनात सूडभावना निर्माण होईल. जपा. मनावर संयम ठेवा व सहनशील बनून आचरण करा. तेच सुखाचे होईल. शत्रुराशीतील शनि विविध कारणांनी गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. ज्यांची स्थावर संपत्ती आहे, त्यांना स्थावर संबंधी समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. मंगळ-नेपच्यून प्रतिकुल असल्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी गैरसमज वा अन्य कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. नपेक्षा अपयश येण्याची शक्यता दिसते. मनस्तापामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचा एखादा आजार त्रस्त करील. जपा. विविध कारणांनी संततिसुखातही बाधा येणे संभवते. जपा. काहींना मूळव्याधीसारख्या आजाराशी मुकाबला करावा लागेल. अशा प्रतिकुल काळात संत-सज्जनांचा सहवास दिलासा देईल. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. सर्व नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व सुखदायक होईल. व्यापार-व्यवसाय असणारांना महिन्याचा अखेरचा सप्ताह लाभदायक होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे कुटुंबात एखादी शुभ घटना घडू शकेल व आर्थिक चिंता करावी लागणार नाही. कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

(६) कन्या - या महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही मंडळीना अपप्रचारामुळे होणारा असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. तसेच अकारण शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागतील. जपा. काही मंडळीना उगीचच एखाद्या काल्पनिक आजाराची भावना त्रस्त करील. जपा. काहीना फसवणुकीचा त्रास सहन करावा लागेल. जीवनसाथीच्या विक्षिप्त, लहरी आचरणाचा त्रास काहीना सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. शारीरिक उष्णता भडकून ताप येणे, अंगावर फोड येणे, इजा होणे असे आजार होण्याची शक्यता दिसते. जपा. रक्तविकार, ह्रदयविकार असणारांनी विशेष जपावे. काही मंडळीना चोरी, फसवणूक अशापैकी कारणांनी आर्थिक नुकसान सहन करावे लागण्याची शक्यता आहे. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल तर गैरसमज , संशय अशापैकी कारणांनी भागीदारी तुटण्याची शक्यता निर्माण होईल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काहीना उत्तम नोकरी वा आवडते कार्यक्षेत्र मिळणे संभवते. पण हाच शनि भावंड विषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. तसेच महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शनि ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. गुरु ग्रहामुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी असलेला राहू हितशत्रूपासून रक्षण करील, काही मंडळीना परदेशगमनाची संधी देईल, पण तो वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण कारीलसे दिसते. जपा. श्रद्धेने " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " दररोज पठण करा.

(७) तुळा - या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अडचणी, अपेक्षाभंग, अनिष्ट घटना घडणे, आर्थिक समस्या निर्माण होणे, भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करणे, वाद, भांडणे होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता जाणवते. शनी ग्रहाच्या साडेसातीचा केवळ पंचवीस दिवसांचाच काळ बाकी आहे. तेवढा मनावर संयम ठेवून व सहनशील बनून व्यतीत करा. मन:शांतीसाठी आध्यात्मिक उपासना करा. त्यासाठी काळ अनुकुल आहे. सामाजिक कार्याची आवड असणारांनी सामाजिक कार्यात काळ व्यतीत करावा. खूप बरे वाटेल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. वरिष्ठ कौतुक करतील. त्यातून काहीना बढती, पगारवाढ तर काहीना उच्च पद वा एखादे मानाचे स्थान प्राप्त होणेही संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात वा नंतर काहीना नवे आवडते कार्यक्षेत्र मिळणेही संभवते. पण वाममार्ग धन सहज मिळण्याची शक्यता असली तरी तो मोह कटाक्षाने टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. तसेच आर्थिक अपेक्षापूर्तीसाठी जुगार, लॉटरी यांच्या फंदात पडू नका. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणानी अडथळे निर्माण होणे संभवते. गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक अनारोग्य होणे संभवते. उष्णताविकार, ताप येणे, डोकेदुखी, मेंदूविकार अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. मनस्थिती स्थिर व शांत राखण्याचा प्रयत्न करा. विविध कारणांनी अपेक्षित संततिसुखात बाधा येणेही संभवते. जपा. श्रद्धेने शिवोपासना करा.

(८) वृश्चिक - कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. काहींना वाढत्या खर्चाची आर्थिक समस्या त्रस्त करील ; तर काहींना आर्थिक नुकसान वा फसवणूक यांचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने सतत मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनून नम्रतेने आचरण करणेच सुखाचे होईल. कुटुंबातील काही प्रिय जनाचे स्थलांतर झाल्यास अस्वस्थता निर्माण होणे संभवते. तसेच स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. काहीना डोळ्याच्या अनारोग्याची समस्या सतावेल. काही मंडळीना राहत्या जागेच्या समस्येची तर काहीना स्थावर संबंधी समस्या त्रस्त करील. पण शेतकरी वर्गाला मात्र महिन्याचा पूर्वार्ध खूपच लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत खूपच सुधारणा होत असल्याचा अनुभव येईल. नोकरदार मंडळीना काळ सुखकारक व लाभदायक होईल. त्यामुळे आरोग्य चांगले राहील. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत

असणारांना काळ प्रगतिकारक होईल. तसेच सर्व प्रकारच्या कलाकार मंडळीना आणि साहित्यिकांना, वैद्यकीय व्यवसाय असणारांना व औषध विक्रेत्यांना काळ अपेक्षापूर्तीचा व संतोषदायक असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. शुक्रामुळे युवकयुवतींचे विवाह ठरतील. नव्या परिचयातून मैत्रीचे संबंध निर्माण होतील. काही मंडळींच्या इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. पण दिनांक २० नंतर मंगळ ग्रह प्रतिकुल होणार असल्याने अनारोग्य, मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

(९) धनु - शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे याची जाणीव ठेवून आचरण कराल तर या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ सुसह्य होईल. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. पण अन्य व्यावसायिक आणि नोकरदार मंडळीना मात्र चिंता, नियोजित कार्यात अडथळे, अडचणी , विरोध अशा कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. त्यात भर म्हणून आर्थिक नुकसान, फसवणूक अशापैकी कारणानी मानसिक अनारोग्यासह शारीरिक अनारोग्याची भर पडणेही शक्य आहे. काहीना अतिशय थकवा जाणवेल. जपा. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर सतत मन शांत व स्थिर राखले पाहिजे. अशा प्रतिकुल काळात अध्यात्मिक उपानेचा आधार व गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे मधून मधू न घडणाऱ्या मनोनुकुल घटना यांमुळे काळ सुसह्य होईल व दिलासा मिळेल. काही मंडळीना जलप्रवासाची तर काहीना परदेशगमनाची संधी मिळू शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात शनि-मंगळाच्या प्रतिकुलतेमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. काही मंडळीना राहत्या जागेची समस्या तर काहीना स्थावर समस्या त्रस्त करील. गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी कुटुंबात वाद, भांडणे होणे संभवते. जपा. प्रिय जनांच्या दूरत्वामुळे काहीना हुरहूर लागेल. तर काही मंडळीना जीवनसाथीच्या अनारोग्याची चिंता अस्वस्थ करील. राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा.
श्रद्धेने गुरु दत्तात्रेयाची उपासना करा. "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " दररोज पठण करा.

(१०) मकर - या राशीच्या मंडळीना दिनांक २६ पासून शनी ग्रहाची साडेसाती सुरू होत आहे. त्यामुळे त्यांनी आतापासूनच मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून आणि सहनशील बनून आचरण करण्याचा प्रयत्न करावा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. तसेच श्रद्धेने आध्यात्मिक उपासना करावी. त्यामुळे मन:शक्ती प्राप्त होईल व प्रतिकुल काळाशी मुकाबला करणे शक्य होईल. कारण सध्या या राशीच्या लाभस्थानी असलेला शनि व्ययस्थानी जाणार असल्याने सतत प्रतिकुल परिस्थितीशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता जाणवते. रवि-मंगळ व राहूकेतू हे ग्रहही प्रतिकुल असल्याने आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. देणे द्यावेच लागेल; पण येणे वसूल होण्यात अडथळे, अडचणी निर्माण होतील. काही मंडळीना अपेक्षित अर्थप्राप्तीसाठी अपार कष्ट करावे लागतील. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावतील. जपा. काही मंडळीना डोळ्याची दुखणी त्रस्त करतील; तर काहीना दात, घसा, मान दुखणे अशापैकी आजार त्रस्त करतील. जपा. विविध कारणानी संततिसुखात बाधा येणे संभवते. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्य क्षेत्र असणाराना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काहीना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. मात्र इतर नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र काळ प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. अशा परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकाकडूनच अधिक धन मिळू शकेल. काहीना भूमिलाभ होणेही शक्य आहे. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.
(११) कुंभ - सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल झाले असण्याची शक्यता जाणवते. तसे असेल तर मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असाव्यात असे वाटते. त्यामुळे जरा काही मनाविरुद्ध घडले

तर लगेच गहरे नैराश्य येणेही संभवते. अशा अस्वस्थ मनस्थितीत सावधानतेने वाहन चालवणे धोक्याचे होईल. जपा. हटटी स्वभाव व मानापमानाच्या अवास्तव कल्पना असतील तर अकारण शारीरिक पीडा, श्रम, दगदग होऊन गलितगात्र व्हाल. जपा. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावतील. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात तर धनस्थानी मंगळ - हर्शल येणार असल्याने अविचाराचे आचरण होणे संभवते. काहीही मनाविरुद्ध घडले तरी प्रतिक्रिया व्यक्त करू नका. जिभेवर ताबा ठेवा. सहनशील व्हा. तरच होणारा असह्य मनस्ताप काही प्रमाणात सुसह्य होईल व शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद व सुखसमाधान अनुभवू शकाल. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच सर्व प्रकारे अनुकुल व लाभदायक होणार असल्याने महिन्याच्या पूर्वार्धातच जे काय साध्य करावयाचे ते साधून घेण्याचा प्रयत्न करा. स्वतंत्र व्यवसाय असणारांपैकी लोखंड , कोळसा यांचा व्यापार-व्यवसाय असणाराना, तसेच वकिली-सल्लागारी व्यवसाय असणाराना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. संततिबाबतच्या विविध समस्या त्रस्त करतील. त्यामुळे अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. वाद, गैरसमज यांमुळे वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही मंडळीना अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. श्रद्धेने शिवोपासना करा.

(१२) मीन - सध्या या राशीच्या मंडळींचा स्वव्हाव अत्यंत अस्थिर, लहरी व चंचल असा झाला असण्याची शक्यता जाणवते. या राशीची लहान मुले तर अत्यंत हूड व व्रात्य झाली असण्याची शक्यता दिसते. शिवाय मंगळ, केतु व नेपच्यून हे तीन ग्रह प्रतिकुल असल्याने सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. आर्थिक चिंता, भांडणे, गैरसमज, मानहानी , काहीना जुन्यां दबलेल्या प्रकरणांचा पुन्हा होणारा त्रास अशापैकी घटनानी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. ज्यांचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळेच काळ लाभदायक होईल. गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. काही मंडळीना प्रवासाचे योग येतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात नोकरी-व्यवसायात विरोधी परिस्थितीशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काहींच्या प्रेमसंबंधात वाढ होईल. तर काहीचे नवे स्नेह संबंध जुळून येतील. प्रसूतिकाळ असलेल्या स्त्रियांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. तसेच विवाहेच्छू युवक युवतींचे विवाह संपन्न होतील. विविध मार्गांनी कमी-अधिक प्रमाणात धनलाभ होणेही संभवते. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. गुरु ग्रहाच्या स्वामित्वाची राशी आणि त्याची अनुकुलता असल्यामुळे श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा " चे पठण करा.

=====ooooo0oooo=====